महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

# चाळीस हजारासाठी सहा तास मृतदेह अडकून ठेवला

## हकिमी मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटलची शिवसेना (उ.बा.ठा) ने तोडफोड करण्याचा इशारा देताच मृतदेह दिला नातेवाईकाचे ताब्यात

**मलकापुर (महासागर प्रतिनिधी) :-** शहरातील भारत कला रोडवरील हकिमी मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल मध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतून ऑपरेशन होऊन मरण पावलेल्या रुग्णांच्या नातेवाइकांना चाळीस हजार रुपयांची मागणी करत मृतदेह तब्बल सहा तास अडकून ठेवला याबाबतची माहिती रुग्णांच्या नातेवाइकांनी शिवसेना (उ.बा.ठा) शहरप्रमुख गजानन ठोसर, नगराध्यक्ष अॅड हरीश रावळ यांना देताच त्यांनी हॉस्पिटल मध्ये येत मृतदेह पैश्यांसाठी अडवून ठेवल्याचा जाब विचारत हॉस्पिटल तोडफोड चा इशारा देत मृतदेह उचलून नातेवाईकांच्या ताब्यात दिला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की ग्राम शिराढोण येथील कमलबाई यादव इंगळे वय ६८ ह्या घरात पाय घसरून पडल्याने त्यांचा डावा हात व पाय शनिवार ५ एप्रिल रोजी फ्रॅक्चर होऊन त्या जखमी झाल्या त्यांना मलकापूर येथील हकिमी मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल मध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतून ७ एप्रिल रोजी रात्री आठ ते दहा वाजे दरम्यान त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली हॉस्पिटल मध्ये उपचार सुरू असतांना आज ९ एप्रिल रोजी सकाळी चार वाजे दरम्यान हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे हॉस्पिटल मध्येच दुःखद निधन झाले रुग्णालय प्रशासनाने चाळीस हजार रुपये बिल बाकी असल्याचे सांगत त्यांचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यास नकार दिला.

विनवणी करूनही मृतदेह ताब्यात देत नसल्याने रुग्णांचे नातेवाईक यांनी सदर घटनेची माहिती शिवसेना शहर प्रमुख गजानन ठोसर, नगराध्यक्ष अॅड हरीश रावळ यांना सांगितली हॉस्पिटलमध्ये तात्काळ धाव घेत मृतदेह अडकवून ठेवण्याचा जाब विचारत हॉस्पिटलची तोडफोड करण्याचा इशारा देताच हकिमी हॉस्पिटल प्रशासन नरमले, अॅड हरीश रावळ,गजानन ठोसर यांनी मृतदेह उचलून मुलगा योगेश यादव इंगळे, गणेश मारुती इंगळे, अनंत रामचंद्र नारखेडे, सचिन शंकर नारखेडे, प्रदीप पुंजाजी वराडे ,अजय नामदेव नारखेडे, प्रल्हाद तुकाराम बऱ्हाटे या नातेवाईकांच्या ताब्यात दिला.

# शॉक सर्किटने शेतातील गहू व सिंचन साहित्य जळून खाक

## १ लाख ८२ हजाराचे नुकसान



**संग्रामपूर(महासागर प्रतिनिधी)–** म.रा.विद्युत वितरण कंपनी ने शेतात रोवलेला विद्युत पोल पडून विद्युत प्रवाह सुरु असल्याने ३ एकर शेतातील उभा गहू व तुषार सिंचन साहित्य जळून खाक झाल्याने शेतकऱ्याचे १ लाख ८२ हजाराचे नुकसान झाल्याची घटना पातुर्डा (खेल दळवी) शिवारात घडली असून नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

संग्रामपूर तालुक्यातील पातूर्डा बु. येथील सौ.राधाबाई नामदेव निमकर्डे रा.पातुर्डा बु, यांचे खेळ दळवी शिवारात गट नं २०३ मध्ये १ हेक्टर २१ आर शेती आहे.या शेतात उन्हाळी गहू पेरलेला होता.गहू पूर्णपणे काढण्यासाठी तयार झालेला असतांना दि. ८ एप्रिल रोजी दुपारी १२.१५ वा.दरम्यान मधुकर निमकर्डे यांच्या शेतात असलेला उभा विद्युत पोल पडला.त्यामध्ये विद्युत प्रवाह चालू असल्याने शॉर्ट सर्किट झाले.त्यामुळे ३ एकरात पेरलेला गहू पूर्ण पणे जाळून खाक झाला.याच शेतात तुषार सिंचनचे १२ नोझल व ३० पाईपांचा एक सेट होता.

तो ही पूर्णपणे जाळून खाक झाला.त्या मुळे ३ एकर मधील गहू अंदाजे ४४ किंटल रुपये १, लाख५० हजा रू व तुषार सिंचन सेट अंदाजे ३२ हजार रू. असे एकूण १, लाख ८२ हजाराचे नुकसान झाले आहे. घटना स्थळी तलाठी राजेश तांबट व कोतवाल करांगळे हजर झाले. त्यांनी पंचनामा करून तसा प्राथमिक अहवाल तहसीलदार यांना देण्यात आला.यावेळी शेतकरी सौ. राधाबाई निमकर्डे यांनी तहसीलदार संग्रामपूर,वीज वितरण कंपनी सहा. अभियंता वरवट (बकाल )याना निवेदन देवून नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

ह्यावेळी वीज वितरण कंपनी कडून वायरमन नितीन बोराडे, सुरेश वानखडे यांच्या सह शेतकरी उपस्थित होते.

# डासाळा ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात महिलांचे बेमुदत उपोषण



**चिखली (महासागर प्रतिनिधी) :** तालुक्यातील उदयनगरजवळ असलेल्या डासाळा ग्रामपंचायतीच्या कारभाराविरोधात महिलांनी ८ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजेपासून बेमुदत उपोषण सुरू केले आहे. ग्रामपंचायतीने २६ मार्च रोजी घेतलेली ग्रामसभा बेकायदेशीर असल्याचा आरोप करत ती रद्द करण्याच्या मागणीसाठी हे उपोषण सुरू करण्यात आले आहे.

उपोषणकर्त्या महिलांनी दिलेल्या माहितीनुसार, डासाळा येथील गट क्र. १७७ मधील जमीन, जी १९९० पूर्वीपासून मागासवर्गीय व इतर ११ लोकांच्या ताब्यात आहे, त्यावर अतिक्रमण असल्याचा ठपका ग्रामपंचायतीने ठेवला आहे. या संदर्भात ग्रामपंचायतीने कोणतीही पूर्वसूचना न देता आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या जाहीरनाम्यातील नियमांचे उल्लंघन करून २६ मार्च २०२५ रोजी ग्रामसभा आयोजित केली.

महिलांचा आरोप आहे की, ही ग्रामसभा गावात दवंडी फिरवून ग्रामपंचायत कार्यालयासमोर न घेता बेकायदेशीरपणे हनुमान मंदिरात घेण्यात आली.

सरपंच, सचिव, तलाठी आणि कृषी अधिकारी यांच्या संगनमताने ही बेकायदेशीर सभा पार पडली आणि त्यात जमिनीसंदर्भात ठराव मंजूर करण्यात आला. या उपोषणात शिवाजी नामदेव आराख, संगीता नारायण घोडे, सखुबाई रमेश धुरंदर, बेबाबाई शालिकराम वानखडे, देवकाबाई गंगाराम नाडे, कांताबाई किसन गायकवाड आणि मंगला बाई आराख या महिला सहभागी झाल्या आहेत.

# एस.टी.व एस.टी.कामगारांच्या नियमित वेतन व वेतनवाढीस विलंबाबाबत सरकारने त्वरीत निर्णय घ्यावा

## महाराष्ट्र नवनिर्माण राज्य परिवहन कामगार सेनेची मागणी

**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी):-** महाराष्ट्राची जिवनवाहीनी असलेली एस.टी.व एस.टी.कामगार आर्थीक विवंचनेत आले आहेत. महाराष्ट्र राज्यातील एकुण ८७ हजार कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनासाठी दर महिन्याला सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जातो. पण गेले अनेक महिने मागणी प्रमाणे आवश्यक निधी येत नसल्याने कर्मचाऱ्यांना फक्त वेतन देण्यात येत आहे. या महिन्यात पुन्हा केवळ वेतन देण्याइतका सुद्धा सरकारकडुन प्राप्त झालेला नाही. एस.टी.चा संचीत तोटा वाढत आहे.

त्यामुळे एस.टी. व एस.टी.कामगारांची,दयनिय अवस्था होत असुन याकडे सरकारने लक्ष देणे गरजेचे आहे.एस.टी.मध्ये महिलांना अर्धे तिकीट,७५वर्षावरील नागरीकांना मोफत बस प्रवास,६५वर्षावरील जेष्ठ नागरीकांना अर्धे तिकीट सवलत, दिव्यांगांना ७५% सवलत अशा ३१प्रकारच्या सवलती सरकारने एस.टी.मध्ये सुरु केल्या आहेत परिणामस्वरुप निधी ऊपलब्ध होत नसल्याने आर्थिक स्थिती नियोजनाचे अभावामुळे कठीण होत आहे.एस.टी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी सरकारकडून दर महिन्याला सवलत मूल्य प्रतिपूर्ती रक्कम देण्यात येत आहे. ती कधीच पूर्ण येत नसल्याने पूर्ण वेतन देण्यात अडचणी वेतन निर्माण कर्मचाऱ्यांची व महामंडळाची एकूण थकीत देणी रक्कम ही सात हजार कोटी रुपयांच्यावर गेली असून एसटी प्रशासन हतबल झाले आहे. या महिन्याच्या वेतनासाठी व इतर थकीत देणी दर यासाठी शासनाकडे ९२५ कोटी रुपये इतक्या निधीची मागणी करण्यात आली होती मात्र प्रत्यक्षात मात्र२७२ कोटी ९६ लाख रुपये एवढाच निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यातील ४० कोटी रुपये इतकी रक्कम एस.टी.बँकेकडे भरावी लागली. ८७ हजार कर्मचाऱ्यांना केवळ वेतन देण्यासाठी २७७ कोटी रुपये इतकी रक्कम लागते तर पूर्ण वेतन देण्यासाठी ४६० कोटी रुपये इतकी रक्कम लागते.

दीर्घकालीन संपानंतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाला व खर्चाला कमी पडणारी रक्कम शासन देईल असे न्यायालयात कबूल करण्यात आले होते. पण त्यानंतर एकाही महिन्यात गरजेइतका निधी सरकारकडून उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. यावर वेळीच उपाय शोधणे गरजेचे असून कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे.आर्थिक विवंचने मुळे कर्मचारी तणावात काम करीत असून त्याचा परिणाम राज्यातील एस.टी. कर्मचारी यांचे मानसिकतेवर होत आहे.

नियमित वेतनास व वेतनवाढीस होणारा विलंब हा कामगारांवरील अन्याय आहे याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा.राजसाहेब ठाकरे यांचे आदेशाने अशीच स्थिती सतत होत राहली तर आम्हाला राज्यव्यापी आंदोलनचा नाईलाजास्तव अवलंब करावा लागेल असे महाराष्ट्र नवनिर्माण राज्य परिवहन कामगार सेनेचे महाराष्ट्र प्रदेश सचिव प्रदिप गायकी यांनी वृत्तपत्रांशी बोलतांना सांगितले.

# प्रशांत अवसरमोल यांची कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती निवड



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी) :** जळगाव जामोद कृषी उत्पन्न बाजार समितीचे रिक्त असलेल्या उपसभापती पदाची निवडणूक प्रक्रिया ९ एप्रिल २०२५ रोजी पार पडली असून या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत तुळशिराम अवसरमोल यांची अविरोध निवड झाली. सदर निवडणूक कार्यक्रम असेल तिच्या सभागृहामध्ये पार पडला असून समितीचे संचालक भास्कर पांडुरंग राऊत आणि प्रशांत तुळशीराम अवसरमोल या दोघांनाही नामनिर्देशन पत्र सादर केले होते.

परंतु विहित वेळेच्या आत भास्कर पांडुरंग यांनी त्यांचे नामनिर्देशन पत्र मागे घेतल्याने प्रशांत तुळशीराम अवसरमोल यांची समितीच्या उपसभापती पदी अविरोध निवड झाली. निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी एम ए कृपलानी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था जळगाव जामोद यांची अभ्यासी अधिकारी म्हणून निवड करण्यात आली होती. याप्रसंगी समितीचे सभापती प्रसेंनजीत पाटील तसेच प्रकाश अवचार, दत्तात्रय पाटील, देविदास पारस्कर, प्रमोद खोद्रे, विश्वास भालेराव, रंगराव देशमुख,अलका तायडे, वंदना आटोळे, निलेश साबे, मनोहर वाघ, भास्कर राऊत, महादेव भालतडक, उल्हास माहोदे, प्रशांत अवसरमोल, मनोज राठी,मनोरमा दैय्या, माणिक वाघ हे सर्व संचालक यावेळी उपस्थित होते. तर याप्रसंगी गजानन वाघ, सुनील बोदडे, अरूण पारवे, संतोष गवई , देवा दामोधर,ख.वि.स चे अध्यक्ष विठ्ठल वाघ, शालिग्राम रोठे, विष्णू आटोळे, शैलेश दैय्या, इरफान शेट्टी,प्रा.विजय सातव, गुलाबराव आठवले, दत्ता डिवरे यासह कर्मचारी व सर्वपक्षीय पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# संग्रामपुर तालुक्यात रामनवमीनिमित्त रथ मिरवणूक व शोभायात्रा

**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी)** रामनवमी निमित्त तालुक्यात अनेक ठिकाणी ९ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करून नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. व श्रीराम प्रभूच्या प्रतिमा आणि काही ठिकाणी मूर्तीची रथासह भव्य शुभयात्रा काढण्यात आली. यावेळी ढोल ताशा, भजनी मंडळ, डीजेच्या आवाजाने तरुणांनी ''श्रीराम जय ''जय घोषाने संग्रामपूर तालुका दुमदुमून गेला होता. व संग्रामपूर शहरासह पतकामुळे भगवामय दिसत होता. याही वर्षी ६ एप्रिल रोजी आठवडी बाजारातील श्रीराम मंदिरात जन्मोत्सव साजरा करून आसरा माता मंदिराजवळ सकाळ पासूनच ठेवलेल्या मुर्तीचे बजरंग दल विश्व हिंदू परिषद दल यांच्या वतीने भव्य दिव्य अशा श्रीराम मूर्ती चे भाविकांनी पूजन करून दर्शनाचा लाभ घेतला त्यानंतर संध्याकाळी शहरातील प्रमुख मार्गाने प्रभू श्रीरामाची भव्य मूर्ती रथात विराजमान करून ढोल ताशे व डीजेच्या तालावर शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

मिरवणुकी दरम्यान शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने कुठेही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी तामगाव पो.स्टे.चे ठाणेदार राजेंद्र पवार यांनी भेटी देवून पाहणी केली.व गोपनीय अमलदार मनीष वानखडे, रामकिसन माळी, सर्व बिट जमादार, पोलीस कर्मचारी, महिला पोलीस , होमगार्डसह कधी नव्हे एवढा चोख कडक बंदोबस्तात होते. त्यामुळे मिरवणुकी शांततेत पार पडून आसरा माता मंदिराजवळ प्रभू श्रीराम चंद्राची आरती होवून रामनवमी उत्सवाची सांगता करण्यात आली.

# आसलगाव बाजार येथे रामनवमी उत्साहात



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)** जळगाव जामोद तालुक्यातील आसलगाव बाजार येथे रामनवमी निमित्ताने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. संजय कुटे यांच्यासह विश्व हिंदू परिषद चे अमोल अंधारे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या भव्य शोभायात्रेला स्थानिक ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होती.यावेळी विश्व हिंदू परिषद चे सहसंयोजक प्रशांत खोकले, रामनवमी उत्सव समितीचे अध्यक्ष किशोर दाताळकर,राजू भोंगाळे, भगवान टापरे, सुनील तिवारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शोभा यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जळगाव जामोद पोलिसांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# समता पंधरवाडात विविध उपक्रमाचे आयोजन

**बुलडाणा, (जिमाका):** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात समता पंधरवडा राबविण्यात येत आहे. या पंधरवाडाचा मंगळवार दि. ८ एप्रिल रोजी समाजकल्याण कार्यालय येथील सामाजिक न्याय भवनात सामाजिक समता सप्ताहाचे उद्धाटन करण्यात आले. पंधरवाडा कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येणार असून या उपक्रमात सर्वांनी उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन समाजकल्याण सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण यांनी केले. डॉ. अनिता राठोड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक जीवन व त्यांचे कार्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सामाजिक जीवनमान उंचावयाचे असेल तर प्रत्येकाने छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समजुन घेतले पाहिजे. हेच विचार आपल्याला सामाजिक जीवनात तारु शकतात. जिवनात बदल घडवु शकतात, असे प्रतिपादन डॉ. राठोड यांनी केले. सामाजिक सप्ताहामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार असून यामध्ये शाळा, महाविद्यालय स्तरावर प्रबोधन, मार्गदर्शन, वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, लघुनाट्य, मनी मार्जीन योजनेअंतर्गत कार्यशाळा, मुलभुत अधिकार, कर्तव्ये या विषयी व्याख्याने, महीला मेळावा, जेष्ठांना मार्गदर्शन, आरोग्य शिबीर, रक्तदान, संविधान जनजागृती, सच्छता अभियान, कर्मविर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान मेळावा, गटई योजना अशा विविध कार्यक्रमाच्या माध्यामातुन सामाजिक सलोखा निर्माण करण्याचा प्रयन्त सप्ताहाच्या माध्यामातुन होणार आहे. या कार्यक्रमात सर्वानी सहभागी व्हावे, असे आवाहन सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण यांनी केले. सुरुवातीला भारतीय संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन संदीप कपले यांनी केले. त्यानंतर आश्विन हिवाळे यांनी प्रास्ताविकातून सप्ताहात कोणाकोणते उपक्रम राबविण्यात येणार आहे, याची माहिती दिली. या सर्व आर्थिक विकास महामंडळाचे कर्मचारी, वसतीगृहाचे विद्यार्थी, बार्टीचे समतादुत, तालुका समन्वय, सर्व कर्मचारी, स्वछतादुत, सुरक्षारक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अॅड. प्रमोद खनवे यांनी केले.

# सहज प्रणाली:महसुल दस्तऐवज, एका क्लिकवर

**बुलडाणा, (जिमाका) :** जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक जुने महसुली अभिलेख, प्रमाणपत्रासाठी वारंवार महसूल कार्यालयाला भेटी देत असतात. यामुळे नागरिकांचा वेळ व अनेक अडचणीला सामोर जावे लागत होते. परंतु आता सहज प्रणालीच्या माध्यमातून महसुल दस्तऐजव एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. या प्रणालीचा सर्व नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. जुने महसुली अभिलेख जसे जुने नकाशे, भुसंपादन निवाडा प्रत, अकृषक आदेश, इनाम जमीन वाटप रजिस्टर, जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर, लवाद आदेश, नझुल प्रकरणे, प्रमाणित प्रत, नक्कल अशा विविध महसूल दस्तावेजासाठी नागरिक अभिलेख कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिलदार कार्यालयात भेट देत असतात. तथापि जुने महसुली अभिलेख शोधणे ही एक वेळ खाऊ आणि क्लिष्ट प्रक्रिया होती. तसेच जुने दस्ताऐवज जीर्ण झाल्याने उपलब्ध होण्यास अडचणी येत होत्या. त्यामुळे नागरिकांना सुलभपणे नक्कल मिळवण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येवर मात करणेसाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतुन जिल्हा महसुल प्रशासनांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल शाखा, भुसंपादन शाखा, पुनर्वसन शाखा, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, तसेच सर्व तहसिलदार कार्यालय येथील जुने महसुली अभिलेख जतन करण्यासाठी व नागरिकांना सुलभ रितीने अभिलेख उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून अभिलेखाचे संगणकीकरण हा नाविन्यपूर्ण उपक्रम १ ऑगस्ट २०२४ या महसुल दिनांपासुन राबविण्यात आला. त्यानुसार जिल्हा महसुल प्रशासनाने एक सॉफ्टवेअर विकसित केले असून नागरिकांना आवश्यक दस्ताऐवज सदर प्रणालीव्दारे उपलब्ध करुन देण्यात आले आहे. प्रणालीमध्ये प्रकरणाचे वर्ष, पक्षकाराचे नाव, तालुका, गाव, निवाडा क्र.गट क्र. ईत्यादी तपशीलाव्दारे शोधता येईल. सदर प्रणालीला सहज प्रणाली नाव देण्यात आले असुन त्याचे लोकार्पण न्यायमुर्ती अनिल स. किलोर यांचे हस्ते २३ मार्च रोजी करण्यात आले

# बी एस पटेल महाविद्यालयामध्य समान संधी एक दिवशीय कार्यशाळा



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी) –** बापूमिया सिराजोद्दीन पटेल कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय पिंपळगाव काळे येथे संस्थेची संस्थापक अध्यक्ष अॅड सलीम पटेल सहसचिव रब्बानी देशमुख संस्थेचे उपाध्यक्ष प्रा कय्यूम पटेल संचालक सिराजोद्दीन पटेल प्राचार्य डॉ शेख फराह यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ७ एप्रिल रोजी समान संधी कक्षा अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे समान संधी केंद्र अंतर्गत महाविद्यालयांमध्ये समान संधी कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. त्या कक्षा अंतर्गत विद्यापीठाच्या विविध योजना विद्यार्थ्यांना समजावून सांगणे व त्या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा उद्देश आहे.या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक प्रो. डॉ प्रविण डाबरे एस के के महाविद्यालय यांनी विद्यापीठाच्या विविध योजनेवरती प्रकाश टाकला त्यामध्ये कमवा व शिका योजना, विद्यार्थीनी विनाशुल्क पास योजना, विद्याधन योजना, विद्यार्थी सुरक्षा विमा योजना, विद्यापीठाच्या विविध शिष्यवृत्ती योजना, विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाची सायकल योजना, शिक्षण संरक्षण योजना, विद्यापीठाची विद्यार्थी विकास शिष्यवृत्ती योजना, विद्यार्थिनी तक्रार निवारण कक्ष, इत्यादी योजना विद्यार्थ्यांना या कार्यशाळेत समजावून सांगितले.तसेच विद्यार्थ्यांनी या योजनेमध्ये कसे सामील व्हावे हे समजावून सांगितले. वंचित गटातील विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती विद्यार्थांपर्यंत पोहचविण्याचे काम महाविद्यालयातील समान संधी केंद्राचे आहे . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, समान संधी कक्षाचे समन्वयक प्रा डॉ बाबाराव सांगळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा डॉ महेश नेतनास्कर यांनी केले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी डॉ नूर मोहम्मद, डॉ ए एस काझी, चेतन पलन, डॉ निखिल अग्रवाल, डॉआनंद जाधव, प्रा एम पी जांभळे, प्रा एन जी असोले, प्रा शकील खान, प्रा प्राजक्ता बाठे, डॉ दिपाली सिरसाठ, प्रा मोहम्मद शोयब, गजानन इंगळे, गजानन भोपळे, परेश अवचार ,वसीम देशमुख, अक्षय तायडे यांनी परिश्रम घेतले.

# महिलेची फसवणुक करून ६२ हजाराचा मुद्देमाल लंपास

**खामगाव (का.प्र.)** महिलेकडे असलेले सोन्याचे दागिने सुरक्षित ठेवण्याची बतावणी करून फसवणूक केल्याच्या तक्रारी वरून आरोपी विरुद्ध शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सौ.सविता नरेंद्र चौखंडे वय ५० वर्ष रा. मोठी उमरी अकोला यांनी शहर पोलिस स्टेशनला तक्रार दिली की, ५ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ वाजता शेगाव येथील लहुजी वस्ताद चौकात आरोपी अश्विन देशपांडे रा.मुंबई याने माझ्या जवळ असलेले सोन्याचे १५ ग्रॅमचे मंगळसुत्र कि. ३७ हजार ५०० रुपये, दोन सोन्याचे अंगठ्या त्या मध्ये ४ ग्रॅम व ३ ग्रॅम वजानाच्या कि. १७ हजार ५०० रुपये, सोन्याचे कानातले वजन ३ ग्रॅम कि, अं ७ हजार ५०० रुपये असा एकुण ६२ हजार ५०० रुपयाचे सोन्याचे दागीने त्याचे जवळ सुरक्षित ठेवतो असे सांगुन घेतले व तेथून निघून गेला तेव्हा पासून त्याच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता फोन बंद येत आहे. त्यामुळे आश्विन देशपांडे यांनी माझी फसवणुक केली आहे. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी अश्विन देशपांडे विरुद्ध कलम ३१८ (४) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नियमित वाचा
महासागर
बातम्या व जाहिरातींसाठी संपर्क
9561361404

## घरासमोरील मोटरसायकल लंपास, गुन्हा दाखल

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)** – घरासमोर ठेवलेली होंडा शाईन मोटरसायकल लंपास झाल्याची घटना २८ मार्च च्या रात्री शहरातील सिद्दिकीय नगर येथे घडली होती.

दरम्यान या प्रकरणी आज नऊ एप्रिल रोजी अक्रम खान मुक्तार खान वय २६ वर्ष रा सिद्दिकी यानगर नांदुरा यांनी नांदुरा पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की २८ मार्च च्या रात्री एमएच २८ । ४५२६ या क्रमांकाची होंडा शाईन मोटरसायकल घरासमोर लावली असता सदर मोटरसायकल रात्री कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली या तक्रारीवरून नांदुरा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध कलम ३०३ (२) भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे.

## घरगुती ३ गॅस सिलेंडर जप्त



**खामगाव** – स्थानिक सामान्य रूग्णालया जवळील सोसायटीच्या गोडावूनमधील एका खोलीत चढ्या दराने एलपीजी गॅस विक्री करण्यात येत असल्याची गोपनिय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी काल ८ एप्रिल २५ रोजी दुपारी २.५० वाजताच्या सुमारास छापा मारला असता पोलिसांनी स्प्रे मोटर पंप, इलेक्ट्रॉनिक काटा, ३ गॅस सिलेंडर सह इतर साहित्य असा एकुण २१ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोहेकॉ प्रदीप मोठे यांनी शहर पोस्टेला दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी शेख इमरान हारून (वय ३० वर्ष, रा.सजनपुरी) याचे विरूध्द कलम २८७, २८८ भान्यासं, सहकलम ३, ७ जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास एपीआय भागवत मुळीक करीत आहेत.

## नांदुरा तालुक्यात १६ एप्रिलला सरपंच आरक्षण सोडत



**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)**– महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ –अ ग्रामविकास विभाग, मुंबई यांची अधिसूचना ०५/०३/२०२५ व जिल्हाधिकारी, बुलढाणा यांची सुधारीत अधिसुचना २१/०३/२०२५ नुसार नांदुरा तालुक्यातील एकूण ६५ ग्रामपंचायतीच्या सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी सपरंच पदाचे आरक्षण महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनीयमाचे कलम ३०(४)(५) अन्वये तसेच मुंबई ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच निवडणूक नियम १९६४ मधील तरतूदी नुसार नांदूरा तालुक्यातील सार्वत्रीक निवडणूकीद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चीत करण्यात १६/०४/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता तहसिलदार नांदूरा यांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय इमारत तहसिल कार्यालय, नांदुरा येथे सोडत काढण्यासाठी सभा आयोजीत करण्यात आलेली आहे.

तसेच अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग व खुल्या प्रवर्गांतर्गत महिला करीता आरक्षणाची सोडत जिल्हाधिकारी, बुलढाण यांचे अध्यक्षतेखाली २५/०५/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजात जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे सुरू होणार असून उपविभागातील मलकापूर अंतर्गत नांदुरा तालुक्याचे महिलांकरिता आरक्षण सोडत दुपारी २ वाजता निश्चीत करण्यात येणार आहे.

सदर आरक्षण सोडतीकरीता नांदुरा तालुक्यातील सर्व लोकप्रतीनीधी राजकीय पक्षाचे पदाधिकारी व नागरीकांनी जास्तीत जास्त संख्येने सदर ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत तहसिलदार नांदुरा यांनी कळविले आहे.

## शेगावात दोन मॅजिक वाहने अज्ञाताने जाळले, गुन्हा दाखल



**शेगाव** – दुसऱ्या दिवशी चे नंबर साठी बस स्थानकासमोर उभ्या करून ठेवलेल्या दोन काळी पिवळी मॅजिक वाहनांना अज्ञात इसमाने आज पहाटेच्या सुमारास आग लावून पेटवून दिले. या घटनेत दोन्ही वाहने जळून खाक झाली आहेत. शेगाव येथील बसस्थानकासमोर मंगळवारी रात्री दोन जणांनी आपली काळी पिवळी (मॅजिक) प्रवासी वाहने दुसऱ्या दिवशीच्या नंबर साठी रस्त्याच्या कडेला उभी करून ठेवली होती. या वाहनांना आज बुधवारी पहाटेच्या सुमारास अज्ञात इसमाने पेटवून दिले. या घटनेमध्ये दोन्ही वाहने पूर्णतः जळून खात झाली. कुटुंबाचे उदरनिर्वाह चालविण्यासाठी ज्ञानेश्वर लिप्ते आणि इमरान खान या प्रवासी वाहन चालविणाऱ्या चालकांवर आता बेरोजगारीची कुऱ्हाड चालली आहे. मागील काही दिवसांपासून बस स्थानक परिसरात चोऱ्या आणि विविध अवैध व्यवसायांना ऊत आले आहे. त्याचाच हा परिपाक असल्याची प्रतिक्रिया या भागातील नागरिक व्यक्त करीत आहेत.

## चिखलीत फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेचा उत्सव रंगणार



**चिखली (महासागर प्रतिनिधी)**– सम्राट अशोक , सत्यशोधक , क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार , विश्वरत्न , महामानव , बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सम्राट अशोक, फुले, आंबेडकर, जयंती उत्सव समिती २०२५, चिखली यांच्या वतीने ९ ते १३ एप्रिल २०२५ या कालावधीत फुलेआंबेडकर वाटिका, चिखली येथे विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाची सुरुवात ९ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक प्रा. विठ्ठल कांगणे सर यांच्या बहुमोल मार्गदर्शनाने होणार आहे. १० एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता महाराष्ट्र प्रदेश संघटक, संभाजी ब्रिगेडचे इंजी. तुषार उमाळे हे ''वर्तमान परिस्थितीत महामानवांच्या विचारांची गरज'' या ज्वलंत विषयावर व्याख्यान देणार आहेत.

१२ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता सुप्रसिद्ध गीतकार, चित्रपट लेखक व साहित्यिक प्रा. डॉ. विनायक पवार यांचे मार्गदर्शन होणार असून, कवी प्रलय आणि आंबेडकरी साहित्याचे अभ्यासक डॉ. स्वप्निल चौधरी यांचेही विशेष सादरीकरण होणार आहे. तसेच १३ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचे राष्ट्रीय प्रबोधनकार भीमशाहीर मनोज राजा गोसावी व त्यांची पार्टी, नागपूर यांच्या भीमगीतांचा थरारक ऑर्केस्ट्रा सादर होणार आहे. या सर्व कार्यक्रमांना समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सम्राट अशोकफुलेआंबेडकर जयंती उत्सव समिती, अध्यक्ष श्रीकांत शिनगारे यांनी केले

## हावडा जाणाऱ्या गाड्या १४ दिवस रद्द, प्रवाशांचे हाल

**खामगाव (का.प्र.)**– हावडा जाणाऱ्या व हावड्या वरून सुटणाऱ्या तीन रेल्वे गाड्या ईस्टर्न रेल्वे मार्गावरील तिसऱ्या व चौथ्या लाईन जोडणी कामासाठी १४ दिवस रद्द करण्यात आल्या आहेत. हावडा वरून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस गीतांजली एक्स्प्रेस (१२८६०) १२ एप्रिल पासून २५ एप्रिल पर्यंत रद्द करण्यात आली आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वरून सुटणारी व हावडा जाणारी गीतांजलि एक्सप्रेस (१२८५९) १३ एप्रिल पासून २६ एप्रिल २०२५ पर्यंत रद्द करण्यात आली आहे. तर हावडा पुणे आझाद हिंद एक्सप्रेस (१२१३०) १२ एप्रिल ते २५ एप्रिल २०२५ पर्यंत रद्द करण्यात आली तर पुणे ते हावडा धावणारी (१२१२९ ) एक्सप्रेस रद्द आहे. तसेच हावडा लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस (१८०३०) व लोकमान्य टिळक टर्मिनस हावडा एक्सप्रेस (१८०३० ) ह्या रेल्वे गाड्या संत्रागाची वरून सुटतील व संत्र्याची पर्यंतच सुरू राहतील.

ईस्टर्न रेल्वेच्या तिसऱ्या व चौथ्या लाईन जोडणीमुळे १४ दिवस रद्द केलेल्या गाड्यांमुळे रेल्वे प्रवाशांना मात्र नाहक त्रास सहन करावा लागणार आहे.

रद्द झालेल्या सर्व गाड्या मध्य रेल्वेच्या मार्गावरील असल्याने बुलढाणा जिल्ह्यातून मलकापूर, नांदुरा व शेगाव सारख्या महत्त्वपूर्ण स्टेशनवर तिकीट केलेल्या प्रवाशांना देखील याचा चांगलाच फटका बसला आहे.

## कॉलेज ऑफ मेनेजमेंटच्या माजी विद्यार्थीनीद्वारा तरुणांसाठी आर्थिक साक्षरता कार्यशाळा संपन्न



**खामगाव (का.प्र)**– ५ एप्रिल २०२५ रोजी कॉलेज ऑफ मेनेजमेंट मध्ये तरुणांसाठी आर्थिक साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत चाणाक्ष आर्थिक निर्णयासह आपले भविष्य सुरक्षित कसे करावे या विषयावर चर्चा करण्यात आली.

कार्यशाळेच्या विशेष वक्त्या कॉलेज ऑफ मेनेजमेंटच्या माजी विद्यार्थिनी , प्रमाणित आर्थिक साक्षरता शिक्षिका प्रा. धनश्री वाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शनपर माहित देत हुशारीने पैसे व्यवस्थापित कसे करायचे, बचत आणि गुंतवणूकीच्या युक्त्या , सामान्य कर्जाच्या जाळयात अडकणे कसे टाळावे,आर्थिक स्वातंत्र मिळविण्यासाठी कसा प्रयत्न करावा, आपले आर्थिक उद्दिष्ट निश्चित कसे करावे आणि साध्य कसे करावे या बाबत चर्चा केली.

लक्ष्मीनारायण शैक्षणिक संस्थे द्वारा संचालित कॉलेज ऑफ मेनेजमेंट बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.बी.ए., बी.सी.ए., सर्व विभागाच्या विद्यार्थ्यांनी तसेच स्व. मीनाताई जाधव औ. प्र. संस्थेचे इलेक्ट्रिकल, फिटर, कोपा विभागाच्या विद्यार्थ्यांनी, लक्ष्मीनारायण कॉलेज ऑफ फार्मसी या विद्यार्थांनी देखील या कार्यशाळेचा लाभ घेतला. व असंख्य संख्येने विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवित कार्यक्रमातून अनमोल माहिती आत्मसात केली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कॉलेजच्या उपप्राचार्य प्रा.कोमल मन्नी, प्रा. पुष्पा जावरे, प्रा. धनश्री चंदन, प्रा. वैशाली पुदागे, प्रा. कोमल उन्हाळे, प्रा. माधुरी काटोले, प्रा. विनोद डाबरे, प्रा. गौरव माने, प्रा. सुमेध वानखडे, प्रा. राधिका अरबट, प्रा. समीक्षा हिंगणे, प्रा. रुपाली लांडे, प्रा. मोनिका अरबट, प्रा. वसीम खान, प्रा. दीपक बघे, प्रा. आकाश खंडेराव , प्रा. मयूर इंगोले, प्रा. पवन आखरे, प्रा. घुले, प्रा. अश्विनी पाटमासे, प्रा. अनिस , प्रा. मोह. दानिश, प्रा. महेश कऱ्हे, प्रा. अंकित मुळे, कुलदीप राजपूत ,स्वप्नील शिंदे , प्रदीप पानझाडे, सुनिता बोराडे यांनी सहकार्य केले.

## आग लागून जेसीबी भस्मसात



**खामगाव** – तालुक्यातील पिंप्री देशमुख शिवारात मुरूम उत्खनन करताना जेसीबी जळून खाक झाल्याची घटना आज दुपारी घडली. यासंदर्भात वृत्त असे की, तालुक्यातील पिंप्री देशमुख शिवारात शंकर होनाळे यांच्या जेसीबीने काल ८ एप्रिल रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमक दल घटनास्थळी पोहोचले होते. परंतु आगीने रौद्ररूप धारण केल्यामुळे जेसीबी जळून खाक झाली होती. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने तापमानात सातत्याने वाढ होत आहे. त्यातच जेसीबीव्दारे अविरत उत्खनन झाल्यामुळे मशिनरी गरम होऊन वायरिंगमधे शॉट सर्किट झाल्याने अचानक जेसीबीला आग लागली असावे असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

## प्रिपेड ऑटोसेवा सुरू केल्याबद्दल ठाणेदारांचा महिला रेल्वे प्रवासी संघटनेकडून गुणगौरव

**शेगाव (महासागर प्रतिनिधी)**– जिल्हा पोलीस दलाकडून रेल्वे स्थानकावर प्रिपेड सेवा सुरू केल्याबद्दल ७ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता दरम्यान महिला रेल्वे प्रवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ठाणेदार नितीन पाटील यांचा गुणगौरव केला. यावेळी महिला संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महिलांबाबतच्या इतर विषयांवरही चर्चा केली. त्यावर ठाणेदार पाटील यांनी समर्पक व समाधानकारक मार्ग सुचविला. यावेळी राष्ट्रीय रेल्वे महिला प्रवासी संघटनेच्या माधुरी शर्मा, मनिषा टाकसाळ, सौ.तृषाली धावडे, सौ.माला कोल्हे, सौ.कल्पना मकेश्वर, सौ.मिना इंगळे, सौ.वृशाली धावडे, सौ.हर्षा डवले, सौ.प्रीती तिवारी, सौ.अनिता शर्मा, कुमूदिनी मंडाळे, प्रणिता शिरभाते, जयश्री पवार, चंदा ददगाळ, वैशाली जोशी आदी उपस्थित होत्या.


नियमित वाचा
महासागर


## महामानवांच्या जयंती निमित्त अवैध दारूबंदी ठेवा अन्यथा धडक कारवाई -ठाणेदार आलेवार



**सुलतानपूर (महासागर प्रतिनिधी)**– ८ एप्रिल रोज मंगळवारला सायंकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सुलतानपूर येथे मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार व्यंकटेश्वर आलेवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शांतता कमिटी बैठक संपन्न झाली. १ ते १४ एप्रिल दरम्यान क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, जैन धर्माचे संस्थापक महावीर, तसेच हनुमान जयंतीच्या पर्वावर ही बैठक संपन्न झाली.

ठाणेदार व्यंकटेश्वरआलेवार यांनी स्थानिक हेडफोन्स टेबल यांना गावात या दिवशी अवैध दारू विक्री झाल्यास धडक कारवाई करा. अशा सूचना दिल्या. यामुळे ह्या महामानवांच्या जयंती मध्ये कोणत्याही प्रकारचा गोंधळ होणार नाही. हा जयंती उत्सव शांततेच्या आणि कायदा व सुव्यवस्थेच्या मार्गाने पार पडवा. आणि गावकऱ्यांना आवाहन केले की आपण सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करून आपला जयंती उत्सव योग्य प्रकारे पार पाडावा. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही असे कोणतही कृत्य आपल्या हातून घडणार नाही याची आपण सर्वांनी खबरदारी घ्यावी. अशा सूचना दिल्या.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक हेड कॉन्स्टेबल राजेश जाधव यांनी केले तर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मेहकर पोलीस स्टेशन चे ठाणेदार व्यंकटेश्वरआलेवार साहेब दुय्यम ठाणेदार पवार साहेब हेड कॉन्स्टेबल विजय बेंडवाल मेहकर लोणार विधानसभा नेते नागवंशी संघपाल पनाड, जमीर सेठ, तंटामुक्ती अध्यक्ष राजेश पिंपरकर, सुभाष खेत्रे, महेंद्र पनाड, अख्तर भाई, प्रेम झोरे, रवी झोरे, मनोहर भानापुरे, सागर पनाड, दीपक राजगुरू राहुल अवसरमोल बिंबीसार पनाड,शुद्धोधन सरदार , पत्रकार भाई सुरेश मोर, निसार भाई, राजेश अवचार ,प्रल्हाद टकले इत्यादी असे सर्वच समाजाचे तोलामोलाचे गावकरी मंडळी या ठिकाणी उपस्थित होती.

## समता पंधरवाडात विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्राचे वितरण



**बुलडाणा (जिमाका)**– महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात समता पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. त्यानुसार जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे विशेष मोहिमेंतर्गत ६७० विद्यार्थ्यांनाचे जात वैधता प्रमाणपत्राचे ऑनलाईन वितरण व ७५ त्रुटीची पुर्तता समता पंधरवडाच्या पहिल्या सप्ताहात करण्यात आले.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बुलडाणा कार्यालयातर्फे १ ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत ''समता पंधरवाडा'' विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. पंधरवाडाच्या पहिल्या सप्ताहात (दि. १ ते ७ एप्रिल २०२५) या कालावधीत राज्यातील ११ व १२ वी विज्ञान शाखेतील २०२५-२६ मधील सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी तसेच त्रुटीची पुर्तता करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्ततेचे ई-मेल आलेले आहेत अशा ७५ अर्जदारांनी त्रुटीची पुर्तता करुन ऑनलाईन जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित केलेले आहे. तसेच विज्ञान शाखेतील २०२५-२६ मधील ११ व १२ वीच्या ६७० मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ऑनलाईन जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. जिल्ह्यातील ११ व १२ वीच्या विज्ञान शाखेतील व डिप्लोमाच्या तृतीय वर्षातील सन २०२५-२६ मधील प्रवेशीत सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी समिती कार्यालयात परिपूर्ण अर्ज सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य, माया केदार यांनी केले आहे.

## २६ तलावाच्या मासेमारी ठेक्यासाठी निविदा आमंत्रित



**बुलडाणा (जिमाका)**– : शासनाने सुधारीत तलाव, जलाशय धोरण जाहिर केले आहे. त्यानुसार सन २०२५-२६ वर्षाकरिता, बुलढाणा जिल्ह्यातील ५०० हेक्टर खालील २६ तलाव निर्धारित कार्यक्षेत्रातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना शासन निर्णय, अटी व शर्तीचे अधिन जिल्हास्तरीय तलाव ठेका समितीचे मान्यतेने तलाव मासेमारी ठेक्याने देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील ५०० हेक्टर खालील २६ तलाव पळसखेड भट ३० हेक्टर, मातला २७ हे., कव्हळ ४१ हे., चांदई/गोद्री ३५ हे., ब्राम्हणवाडा ९६ हे., हराळखेड ४२ हे., चायगांव २३ हे., पळशी बोरी ५७ हे., कळपविहीर ३३ हे., पिंपळगांव चिलमखाँ २८ हे., शिवणी आरमाळ ८५ हे., तांदूळवाडी ३५ हे., निमगांव वायाळ १० हे., चोरपांग्रा ३६ हे., धामणगांव बढे ३५ हे., गणेशपूर २२ हे., हिवरखेड क्र. १२० हे., लांजुड ३६ हे., पिंपरखेड २९ हे., कंडारी ४० हे., पलढग ११९ हे., नेतन्सा ११९ हे., बोराखेडी १४४ हे., ढोरपगांव १०५ हे., निम्नज्ञानगंगा- १७१ हे., दुर्गबोरी १४ हेक्टर या तलावांची मुदत दि. ३० जून २०२५ रोजी संपुष्टात येत आहे. सन २०२५-२६ वर्षाचे तलाव ठेका प्रक्रियाकरिता नोंदणीकृत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना शासन निर्णय अटी व शर्तीचे अधिन जिल्हास्तरीय तलाव ठेका समितीचे मान्यतेने तलाव मासेमारी ठेक्याने देण्याचे प्रस्तावित आहे.

शासन निर्णय कृषी व पदुम विभाग दि. ३ जुलै २०१९ मधील तरतूदी व अटी शर्तीनुसार बुलढाणा जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाचे तलाव ठेका मुदत संपुष्टात आलेले तलाव नव्याने मासेमारी ठेक्याने देण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. याबाबत सविस्तर तपशील शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), बुलढाणा कार्यालयाचे नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे, अशी माहिती सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां), बुलढाणा कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.


RNINo-MAHMAR 2010/35857 महासागर खामगांव[बुलढाणा] मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय मो.बा.९०२८४५८८८७ भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्यसंपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय- नागपूर मो.बा.७४४७७३८८५१, ९९२२९७००२३ बुलडाणा जिल्हा आवृत्ती प्रमुख, स्थानिक संपादक यशवंत विनायक पिंगळे मो.बा.९५६१३६१४०४, (शहर कार्यालय-रेल्वेस्टेशन चौक, खामगाव) ई-मेल-yashwantpingle525@gmail.com

